




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : २२८ वा मंगळवार दि ०४ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# राष्ट्रवादीत पक्ष संघटनेत मोठा बदल, निवडणुकांआधी अजित पवारांची बारामतीत महत्त्वाची राजकीय खेळी...

**वृत्तसंस्था/ बारामती**

बारामती तालुक्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात संघटनात्मक बदल करण्यात आला आहे. संदीप कृष्णराव बांदल यांची तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येत असल्याने ही खांदेपालट झालेली मानली जात आहे. अजित पवार यांचे विश्वासू आणि निष्ठावान कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणारे बांदल यांनी पूर्वी गुणवडी ग्रामपंचायतीचे सरपंच, पंचायत समिती सदस्य आणि सभापती अशी विविध पदे भूषवली आहेत. या निर्णयामुळे बारामती तालुक्यातील राष्ट्रवादीमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी या नियुक्तीचे स्वागत करत, संदीप बांदल यांच्या नेतृत्वाखाली संघटन अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. तसेच, युवक काँग्रेसच्या तालुकाध्यक्षपदावरही लवकरच नवे नेमणुकीचे संकेत मिळत आहेत. बारामतीत संदीप बांदल यांची तालुकाध्यक्षपदी निवड ही केवळ एका व्यक्तीची बढती नसून, त्या मागील दूरगामी राजकीय रणनीती महत्त्वाची आहे. हा बदल स्थानिक राजकारणावर आणि अजित पवार गटाच्या संघटन रचनावर मोठ्या प्रमाणावर परिणाम करू शकतो. नेतृत्व बदलाचा राजकीय अर्थ असा की, संदीप बांदल हे अजित पवार यांचे निष्ठावान आणि परीक्षा दिलेले कार्यकर्ते असल्याने, स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह निर्माण होईल आणि संयोजनाची वीण घट्ट होईल.काही काळापासून बारामती तालुकाध्यक्षपदासाठी चुरस किंवा गटबाजीची चर्चा रंगली होती. नेतृत्वाकडून बांदल यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याने अंतर्गत मतभेदांना नियंत्रणात ठेवण्याचा आणि संघटन बळकट करण्याचा संदेश कार्यकर्त्यांमध्ये गेला आहे. निवडणूक रणनीतीसाठी परिणाम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर नवा चेहरा दिल्यास, युवक आणि नव्या मतदारांना आकर्षित करता येईल, हा यामागचा स्पष्ट उद्देश मानता येतो. बांदल यांचा आर्थिक, सामाजिक आणि स्थानिक प्रश्नांवर अनुभव असल्याने, प्रचार व विकासाच्या दृष्टीने पक्ष अधिक मजबूत होण्याची शक्यता आहे. अजित पवारांनी युवक काँग्रेससह अन्य संघटनात्मक निवडींमध्येही बदलाची तयारी दाखवल्याने, पक्षाच्या उच्चस्तरीय नियंत्रणाखाली नेतृत्व पिढीनुसार बदलले जाईल, असा संदेश दिला जात आहे. हा बदल बारामतीसह पिंपरी-चिंचवड आणि पुणे ग्रामीण भागातील पक्षाची पकड घट्ट करण्याचा मोठा प्रयत्न मानला जातो.



संदीप बांदल यांची निवड हा केवळ चेहरा बदल नसून, त्यामागे पक्षसंघटना आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजित पवार गटाच्या ताकदीचा डाव आहे. यामुळे स्थानिक नेतृत्व बळकट होईल आणि कार्यकर्त्यांमध्ये नव्या जोमाने चळवळ होईल, असा राजकीय विश्लेषणातून निष्कर्ष निघू शकतो.

# कर्जत मतदारसंघात महायुतीला तडा, अजित पवारांच्या राष्ट्रवादीची आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची युती



**वृत्तसंस्था/ रायगड**

राज्यात महायुती सरकार असताना रायगड जिल्ह्यातील कर्जत विधानसभा मतदारसंघात राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल घडला आहे. कर्जत मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महायुतीतून वेगळं होत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाशी हातमिळवणी केली आहे. आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका एकत्र लढवणार असल्याची अधिकृत घोषणा दोन्ही पक्षांच्या बैठकीत करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या घडामोडी आता कुठपर्यंत जाणार? ते पाहणं महत्वाचं असणार आहे.शनिवारी कर्जत येथील रेडिसन ब्लू रिसॉर्टफ येथे झालेल्या संयुक्त बैठकीत दोन्ही पक्षांचे जिल्हा आणि तालुका पातळीवरील प्रमुख नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसकडून जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, कार्याध्यक्ष अशोक भोपतराव, प्रवक्ता भरत भगत, उपाध्यक्ष एकनाथ धुळे, प्रदेश नेते भगवान भोईर तसेच युवक, महिला आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. तर शिवसेना (ठाकरेगट) तर्फे उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत, प्रभारी तालुका प्रमुख बाजीराव दळवी, तालुका संघटक बाबू घारे, संपर्क प्रमुख भीमसेन बडेकर, युवासेना आणि महिला आघाडीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत कर्जत विधानसभा मतदारसंघातील कर्जत, खोपोली, माथेरान या तीन नगरपरिषदांबरोबरच खालापूर नगर पंचायत, रायगड जिल्हा परिषदेच्या सहा जागा आणि पंचायत समितीच्या बारा जागांवर संयुक्त उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सध्या महायुतीचा घटक असूनही, कर्जत मतदारसंघात मात्र महायुतीत फूट पडली आहे. मागील विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनाहे एकमेकांविरोधात रिंगणात उतरले होते. त्यानंतर गेल्या काही महिन्यांपासून या दोन्ही पक्षांमध्ये गुप्त बैठकांची मालिका सुरू होती. अखेर त्या चर्चेला युतीचं रूप देत ड्ड्स्थानिक पातळीवर महायुती संपलीफ्ह असा स्पष्ट संदेश दोन्ही पक्षांनी दिला आहे. या नवीन राजकीय समीकरणामुळे रायगड जिल्ह्यातील राजकारणात चांगलीच खळबळ माजली आहे. विशेषतः कर्जत, खोपोली, माथेरान आणि खालापूर या भागातील आगामी निवडणुका आता अधिक रंगतदार होणार आहेत. दोन्ही पक्षांनी युतीची घोषणा करताना जनतेच्या प्रश्नांवर आणि स्थानिक विकासाच्या मुद्यांवर आम्ही एकत्र आलो आहोत. पक्षीय स्वार्थ नव्हे, तर जनतेचा विकास आमचं प्राधान्य असेल असं म्हटलं आहे.

# आता बंदुका नकोत...

## संपादकीय लेख

माओवाद्यांचा मोठा नेता, सेंट्रल कमिटीचा सदस्य मल्लोजुला वेणुगोपाल राव उर्फ भूपती आपल्या अनेक समर्थकांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समक्ष पोलिसांना शरण आला. त्यावेळी तो ज्या पद्धतीने मुख्यमंत्र्यांशी हसून बोलत होता, त्यावरून तो कुठल्याही दबावात होता असे दिसत नव्हते. ना तो पोलिसांच्या दबावात वाटला आणि ना माओवादी चळवळीच्या. ही चळवळ आपण सोडून चाललो आहे, आपले काय होईल, या भीतीचा लवलेशही त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता. कधीकाळी माओवाद्यांचा नेता पेद्दी शंकर जेव्हा पोलिसांकडून मारला गेला होता, त्यावेळी पेद्दीची खबर पोलिसांना दिल्याच्या संशयावरून एका शिक्षकाचा हात तोडला गेला होता. त्यावरून इतकी दहशत माजली होती की, पुढे माओवाद्यांची खबर देताना चार वेळा विचार केला जात असे. २००९ साली माओवाद्यांच्या हल्ल्यात ५२ जवान शहीद झाले होते. त्यामागे दहशत माजविणे हाच हेतू होता. पण काळ सदैव सारखा नसतो. माओवाद्यांची लोकप्रियता आणि दहशत हळूहळू ओसरत गेली. हे एकाएकी घडले नाही. त्यामागे खूप मोठी तपस्या होती. पश्चिम बंगालच्या नक्षलबारीमधून जमीनदारांच्या विरोधात सुरू झालेले हे आंदोलन बंडखोरांनी पेटवले. त्यांना काही शक्तींचे बळ मिळाले. जिथे जमिनीविषयी गोंधळ आहे, जिथे आदिवासी लोकांचे शोषण होते, जिथे विकासाकडे दुर्लक्ष होत आहे, जिथे घनदाट जंगल आहे, प्रशासनाची पोहोच कमी आहे अशा भागांना लक्ष्य केले गेले. तेथील लोकांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे भडक चित्रण दर्शविण्यात आले. व्यवस्थेच्या विरोधात त्यांना पेटविण्यात आले. ही सगळी मंडळी त्यांची सहानुभूतीदार झाली. चळवळ पसरू लागली. ती १९८०च्या आसपास चंद्रपूर-गडचिरोली पट्ट्यात पसरली. तेंदुपत्ता मजुरांना वाढीव मजुरी मिळवून दे, जंगलातील रानमेव्याला चांगला भाव मिळवून दे, असे प्रयोग करून माओवाद्यांनी लोकांना आपलेसे करून घेण्याचा प्रयत्न चालविला. दुसरीकडे पोलिस आणि शासनाला विरोध करणे, त्यांच्या संपत्तीचे नुकसान करणे, त्यांच्यावर हल्ले चढविणे, भूसुरुंग स्फोट घडविणे आदी मार्गाने दहशत पसरविणे सुरू झाले. पाठोपाठ सिरोंचा, अहेरी, एटापल्ली, भामरागड असे दलम सुरू केले. तरुणांची माथी भडकवून त्यांची दलममध्ये भरती सुरू केली. पुढे त्यांनी भामरागडमध्ये स्फोट घडविला. आमदार धर्मरावबाबा आत्राम यांचे अपहरण करून दहशत माजविण्याचा प्रयत्न केला. राज्याची राजधानी आणि विकास या दोहोंपासून कोसो दूर असलेल्या भागातील अशा प्रकारांकडे फार गांभीर्याने कुणी बघितले नाही. ही चळवळ रोखायची असेल तर ती संवाद, प्रेम आणि सोबत दहशत या मार्गांनीच रोखली जाऊ शकेल हे प्रशासनाच्या लक्षात आले. माओवाद्यांच्या दहशतीला दहशतीने उत्तर देण्यासाठी ऑपरेशन ग्रीन हंट, ऑपरेशन गोदावरी , ग्रेहाउंड्सचे नियोजन केले गेले. नागरिकांना पायाभूत सुविधा मिळाव्या म्हणून शाळा, आरोग्य केंद्रे, रस्ते, पूल यांची रचना केली गेली. त्याचे फायदे दिसू लागले. २०१३ मध्ये माओवाद्यांच्या सेंट्रल कमिटीने ङ्गमहाराष्ट्रात चळवळीला फटका बसत असल्याचे, प्रभाव कमी होत असल्याचे आणि नवी भरती होत नसल्याचीफ नोंद केली. हे सगळे एकत्रित प्रयत्नांचे फळ होते. त्यात पोलिसांचा पुढाकार मोठा होता. त्यांनी आदिवासी मुलांची भरती असलेल्या पोलिसांच्या सी-६० पथकाची निर्मिती केली. माओवादी ज्या भागातून येतात, त्या प्रवेशाद्वारावर पोलिस ठाणी सुरू केली. जनसंपर्क, जनजागरण सुरू केले. पोलिस दादा, लोरा खिडकी सारखा प्रकल्प सुरू करून कागदपत्रे मिळवून दिली. सरकारी योजना जनतेपर्यंत पोहचविल्या. त्यांचा लाभ मिळू लागला. रस्त्यांची निर्मिती झाली. तेथील तरुणांचा शहराशी संपर्क सुरू झाला. मोबाइल टॉवर्स उभे झाले. आता त्यांना जग दिसू लागले. सरकार शत्रू, पोलिस शत्रू ही भावना जाऊन मित्रत्वाची भावना तयार होऊ लागली. स्थानिक जनता आधी माओवाद्यांना पोलिसांच्या खबरी देत असे. आता ते पोलिसांना देऊ लागले. खबरीच्या आधारे कसनासुरला एकाचवेळी ३४ माओवादी मारले गेले. लोक पूर्णपणे आपल्या बाजूने नाहीत. कुठवर पळायचे, कुठवर लपायचे? जागोजागी रस्ते होत आहेत, उद्योग येत आहेत. आपण कुठवर रानोमाळ भटकायचे या भावना माओवाद्यांच्या मनात येऊ लागल्या. तरुणपणी ज्या आवेशाने, दुनिया बदलविण्याच्या हेतूने ते संघटनेत सहभागी झाले होते, ते वास्तव खूप दूर असल्याची जाणीव त्यांना झाली. आधी संघटनेचा जनाधार वाढवायचा की सशस्त्र उठावाचे प्रमाण आणि प्रकार वाढवायचे यावरून भूपती आणि हिडमा यांच्या गटात वैचारिक मतभेद झडू लागले. वाढते वय, आजार आणि आयुष्याची स्थिरता याचा विचार करीत अनेक जण शरण येण्याचा विचार करू लागले. पोलिस नीट वागणूक देतील का, हा प्रश्न होता. प्रारंभी गिरधर शरण गेला. त्यानंतर भूपतीची बायको ताराक्का शरण गेली. त्यांना मिळालेली वागणूक बघून भूपती आणि त्याचे सहकारी शरण गेले. यापूर्वी शरण आलेल्यांना मिळालेली वागणूक, आत्मसमर्पण धोरणाचे फायदे, घरासाठी-जमीनीसाठी मिळालेली मदत, नवजीवन नगरात झालेले पुनर्वसन, संरक्षण, रोजगार, लॉयडमध्ये मिळणारी नोकरी, त्यांच्या शेअर्सचा लाभ आदी बाबी कारणीभूत होत्या. या कामी गडचिरोलीत राहिलेल्या प्रत्येक पोलिस अधिकाऱ्याने आपापल्या परीने प्रयोग केले, हे त्याचे एकत्रित फळ आहे. असे असले तरी पोलिसांच्या खालच्या वर्गात एक वेगळीच सल आहे. ज्या माओवाद्यांच्या गोळ्यांनी आपल्या सहकाऱ्यांचे, मित्रांचे जीव घेतले, त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर यावी, आपल्याला ते करावे लागावे याबाबत त्यांना वाईट वाटते. पोलिसांतील ही भावनाही सरकारला समजून घ्यावी लागेल.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# भाजपकडून दोन्ही पवारांना धक्का; पवारांच्या पक्षाचा नेता फोडला, अजितदादांच्या मंत्र्याचं टेन्शन वाढलं




**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील सिन्नरच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. उदय सांगळे यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्र वादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला हा मोठा धक्का मानला जात आहे. युवा नेते उदय सांगळे यांच्या भाजप प्रवेशामुळे सिन्नरमधील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. हा प्रवेश मंत्री माणिकराव कोकाटेंना शह देण्यासाठी असल्याची चर्चा आहे. नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर मतदारसंघात आज म ोठी राजकीय उलथापालथ झाली. भारतीय जनता पक्षाने मोठी खेळी करत शरद पवारांच्या राष्ट्रवादीला जोरदार धक्का दिला आहे. सिन्नरमधील युवा नेते उदय सांगळे यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत सिन्नर येथे हा पक्ष प्रवेश सोहळा पार पडला.उदय सांगळे यांचा भाजपमधील प्रवेश हा मंत्री माणिकराव कोकाटेंना शह देण्यासाठीची खेळी आहे का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. सिन्नरमध्ये उदय सांगळे यांना युवा नेतृत्व म्हणून ओळखले जाते. स्थानिक राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, सिन्नरमध्ये मंत्री माणिकराव कोकाटे यांना आगामी काळात तगडी स्पर्धा निर्माण करण्यासाठी भाजपने ही रणनीती आखली आहे. सांगळे यांच्या पक्षप्रवेशामुळे ग्रामीण भागात भाजपची ताकद वाढणार आहे, असेही मानले जात आहे.भाजपला सिन्नरमध्ये एक नवा व सक्रिय चेहरा मिळाल्याने, येत्या निवडणुकीत येथील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विधानसभा निवडणुकीवेळी शरद पवार यांनी स्वतः सिन्नरमध्ये त्यांचे उमेदवार असलेले सांगळे यांच्यासाठी सभा घेतल्या होत्या. त्यामुळे एका महत्त्वाच्या नेत्याने ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर पक्षाची साथ सोडल्याने पक्षासाठी हा धक्का मानला जात आहे.

दरम्यान, उदय सांगळे हे कोकाटे यांचे जुने राजकीय विरोधक आहेत. विशेष म्हणजे, कोकाटे यांचे बंधू भारत कोकाटे यांनी देखील काही दिवसांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे आता उदय सांगळे यांचा प्रवेश कोकाटे यांच्यासाठी दुहेरी आव्हान निर्माण करणारा ठरला आहे, असे सध्याच्या राजकीय स्थितीत पाहायला मिळत आहे.

## महाजनांनी उद्धव ठाकरेंना डिवचलं



**मुंबई :** शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे ५, ६ नोव्हेंबर रोजी धाराशिव दौऱ्यावर जाणार आहेत. त्यांच्या या दौऱ्यावर मंत्री गिरीश महाजन यांनी टीका केली आहे. मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांनी जनतेसाठी काहीच केले नाही, असे महाजन म्हणाले. नाशिकमध्ये पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही टीका केली. महायुतीत प्रवेशावर बोलताना महाजन म्हणाले की, ते महायुतीतच लढणार आहेत. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांकडून पैसे मागणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.उद्धव ठाकरे यांनी निधी किती मिळाला हे पाहण्यासाठी धाराशिवला जाऊ नये, तर घरात बसून पाहणी करावी, असा टोला मंत्री गिरीश महाजन यांनी लगावला. मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांनी जनतेसाठी काहीच केले नाही आणि त्यांचे काम 'पर्यटनासारखे' होते, त्यामुळे आता दौऱ्यावरून टीका करणे त्यांना योग्य नाही, असे महाजन म्हणाले. नाशिकच्या दिंडोरी आणि सिन्नर भागात नुकसानग्रस्त भागाची पाहणी आणि पक्षीय कार्यक्रम ासाठी मंत्री महाजन नाशिक दौऱ्यावर आले होते.

याचबरोबर, महायुतीत प्रवेशावर बोलताना आपण ठाम असल्याचे त्यांनी सांगितले. नाशिकमध्ये आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि राजकीय प्रवेशावर त्यांनी आपले मत व्यक्त केले. दिंडोरी आणि सिन्नर येथे मोठ्या प्रमाणात राजकीय प्रवेश होत असून, हे प्रवेश महायुतीला नगरपालिका आणि जिल्हा परिषदेसाठी मदत करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.

## भाजप नेत्या नवनीत राणा रुग्णालयात दाखल

**नागपूर :** भाजप नेत्या आणि अम रावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांना पायाला झालेल्या गाठीमुळे नागपूरम धील नरेंद्रनगर येथील सुयोग हॉस्पिटलम ध्ये दाखल करण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान झालेल्या जुन्या इजेचा त्रास पुन्हा उद्भवल्याने त्यांना उपचारासाठी तातडीने दाखल करण्यात आलं. सुप्रसिद्ध ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. गिरीश मोटवानी यांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली असून सध्या त्या उपचार घेत आहेत. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पुढील २५ दिवस त्यांना पूर्ण बेडरेस्ट करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.नवनीत राणा यांच्या पायाला झालेली दुखापत ही लोकसभा निवडणुकीच्या प्रचार काळात झालेल्या फ्रॅक्चरशी संबंधित असल्याचं वैद्यकीय सूत्रांनी सांगितलं आहे. निवडणुकीच्या काळात सतत प्रवास, सभा आणि जनसंपर्क मोहिमेमुळे त्या इजेला पूर्ण विश्रांती मिळाली नव्हती.

## बीडमध्ये पुन्हा मुंडे विरुद्ध मुंडे लढत?



**बीड :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्षांमध्ये प्रचंड घडामोडी सुरु आहेत. प्रत्येक पक्ष तयारी लागला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकून आपली सत्ता मिळावी यासाठी प्रत्येक पक्षाचे प्रयत्न सुरु आहेत. याच पक्षाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्षाच्या गोटात हालचाली सुरु आहे. सत्ताधारी पक्षांमध्ये तर दररोज पक्षप्रवेशाचे कार्यक्रम पार पडत आहेत. आगामी निवडणुकांसाठी आपली संघटनात्मक ताकद वाढावी यासाठी प्रत्येक पक्ष प्रयत्न करत आहेत. याच दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटातून एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बीडमध्ये स्थानिक राष्ट्र वादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते हे स्वतंत्र निवडणूक लढवण्यावर ठाम असल्याची माहिती आहे. त्यामुळे बीडमध्ये सत्ताधारी भाजप विरुद्ध सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस असा संघर्ष बघायला मिळणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.विशेष म्हणजे बीडमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून भाजप नेत्या पंकजा मुंडे आणि राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांच्यात राजकीय वैर होतं. दोन्ही बहीण-भाऊ असले तरी एकमेकांच्या विरोधात त्यांनी निवडणुका लढल्या आहेत. पण राष्ट्रवादी आणि भाजपची युती झाल्यापासून दोन्ही बहीण-भावांमधील दुरावा कमी झाला होता. पण आता राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांच्या भूमिका पाहता बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा मुंडे विरुद्ध मुंडे असा सामना होण्याची शक्यता आहे. स्थानिक कार्यकर्त्यांची स्वतंत्र निवडणूक लढण्याची भावना आहे. पण युतीबाबत अखेर वरिष्ठ नेतेच निर्णय घेणार आहेत. त्यामुळे याबाबत अंतिम असा कोणताही निर्णय अद्याप झालेला नाही.

## बिहारमध्ये १० पैकी ७ मतं फिरणार? ३४ जागा संकटात



**पाटणा :** बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी जोरदार प्रचार सुरु आहे. राज्यात एनडीए विरुद्ध म हागठबंधन असा थेट सामना आहे. बिहारमध्ये दोन टप्प्यात मतदान होईल. ६ आणि ११ नोव्हेंबरला मतदान झाल्यावर १४ नोव्हेंबरला मतमोजणी होईल. सध्या राज्यात प्रचार सभांचा धुराळा उडाला आहे. आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत.एकीकडे बिहारमध्ये राजकीय वातावरण तापलेलं असताना दुसरीकडे सी व्होटरनं काही महत्त्वाची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. बिहारमध्ये यंदाच्या निवडणुकीत प्रशांत किशोर यांची एन्ट्री झाली आहे. किशोर यांचा जनसुराज पक्ष पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक लढत आहे. प्रशांत किशोर यांचा पक्ष कोणाच्या मतपेढीला सुरुंग लावणार असा प्रश्न सगळ्यांना पडला आहे.सी-व्होटरचे यशवंत देशमुख यांनी बिहार विधानसभा निवडणुकीसंदर्भात काही महत्त्वाचे आकडे शेअर केले आहेत. मागील निवडणुकीत एनडीएला ३७.२६ टक्के, तर महागठबंधनला ३७.२३ टक्के मतं मिळाली होती. तेव्हा चिराग पासवान यांचा लोक जनशक्ती पक्ष स्वबळावर लढला होता. पासवान यांच्या पक्षानं ५.६६ मतं घेतली होती. तर उपेंद्र कुशवाह यांचा पक्ष वेगळ्या आघाडीत होता. आता या दोन्ही पक्षांना सोबत घेत भाजप प्रणित एनडीएनं आपली मतपेढी ७ ते ८ टक्क्यांनी वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. एकीकडे भाजप प्रणित एनडीए मतपेढी वाढवण्याचा प्रयत्न करत असताना दुसरीकडे प्रशांत किशोर एनडीएच्या मतपेढीला सुरुंग लावत आहेत. सी व्होटरच्या आकडेवारीनुसार, किशोर यांच्या पक्षाकडे वळणारे दर १० पैकी ७ मतदार हे एनडीएला म तदान करणारे आहेत. याचा अर्थ किशोर यांचा पक्ष अनेक मतदारसंघांमध्ये भाजप प्रणित एनडीएला धक्का देण्याची शक्यता आहे.प्रशांत किशोर यांच्या पक्षामुळे भाजपच्या ३४ जागा अडचणीत आल्या आहेत. भाजपनं गेल्या निवडणुकीत ७४ जागा जिंकल्या होत्या. यंदा भाजप १०१ जागा लढवत आहेत. किशोर यांच्यामुळे ३४ जागा अडचणीत आल्यानं भाजप मागील कामगिरी कायम राखतो का हे पाहणं महत्त्वाचं असेल. किशोर यांच्या पक्षाच्या उमेदवारामागे उभे राहणारे ७० टक्के मतदार हे एनडीएचे आहेत. त्यामुळे भाजपची गोची झाली आहे.२००९ मध्ये महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक झाली. त्या निवडणुकीत राज ठाकरेंच्या मनसेमुळे शिवसेना, भाजप युतीचं मोठं नुकसान झालं. राज यांच्या मनसेनं पहिल्यांदाच विधानसभा लढत १३ जागा जिंकल्या. अनेक ठिकाणी त्यांचे उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिले. मनसेचा सर्वाधिक फटका शिवसेनेला बसला. मतांच्या विभाजनाचा थेट फायदा काँग्रेस, राष्ट्रवादीला झाला. १६ वर्षांपूर्वी महाराष्ट्रात पाहायला मिळालेला तोच पॅटर्न बिहारमध्ये पाहायला मिळत आहे.

# वृद्ध दाम्पत्याचा मृतदेह आढळला; प्रॉपर्टीच्या वादातून मुलांनीच घेतला आई-बापाचा जीव

**रायगड :** म्हसळा तालुक्यातील मेंडदी येथे शनिवारी रात्री एका ९५ वर्षीय वृद्ध महादेव कांबळे आणि त्यांच्या पत्नी ८३ वर्षीय विठाबाई कांबळे यांचा मृतदेह संशयास्पद परिस्थितीत आढळून आला. या घटनेनं संपूर्ण तालुका हादरला असून, या वृद्ध दाम्पत्याच्या मृत्यूमागे प्रॉपर्टीच्या वादामुळे त्यांच्या दोन सख्खे मुलं नरेश महादेव कांबळे (वय ६२) आणि चंद्रकांत महादेव कांबळे (वय ६०) अडकले असल्याचं उघड झालं आहे.

सदर प्रकरणाची नोंद म्हसळा पोलीस ठाण्यात करण्यात आली, आणि तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांकडून तपास सुरु झाला. पोलिसांनी घरातील परिस्थितीची पाहणी केली असता, पलंगावर वृद्ध दाम्पत्याची कुजलेला मृतदेह पाहून संशयास्पद मृत्यूची स्पष्ट चिन्हे दिसली. सख्ख्या मुलांनी घरातील प्रॉपर्टीच्या वादातून राग धरला होता आणि हा राग त्यांनी हत्येत रूपांतरित केला, असा प्राथमिक निष्कर्ष पोलिसांनी काढला.घटनास्थळी पोहोचलेल्या म्हसळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे, उपपोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर येडवले, रोहिणकर, पोलीस शिपाई सागर चितारे, राजेंद्र म्हात्रे यांसह



फॉरेन्सिक टीम, डॉग स्कॉड, फिंगरप्रिंट एक्सपर्ट यांनी सखोल तपास केला. त्यांनी घरातील प्रत्येक खोली, पलंग आणि फर्निचरची तपासणी करत महत्त्वपूर्ण पुरावे गोळा केले.तपासात हे स्पष्ट झालं की, वृद्ध दाम्पत्य त्यांच्या मुलांना घरातील खर्चासाठी पुरेसे पैसे देत नसल्याम ुळे त्यांनी काही काळासाठी मुलांना घरात राहण्यास मज्जाव केला होता. यामुळे नरेश आणि चंद्रकांत या दोघांमध्ये मनात राग निर्माण झाला, जो हळूहळू संतापात बदलला आणि त्यांनी आपल्या पालकांचा हत्या करण्याचं ठरवलं. पोलिसांनी दोघांना अटक केली असून, दोघेही सध्या पोलिसांच्या ताब्यात आहेत.पोलिसांना घटनास्थळी मिळालेल्या फिंगरप्रिंट आणि डॉग स्कॉडच्या मदतीने घटनास्थळी सखोल पुरावे जमा केले. तसेच, सदर प्रकरणाचे त्वरित फॉरेन्सिक विश्लेषण करण्यात आलं. तपास अधिकाऱ्यांनी सांगितलं की, 'हत्येची ही योजना अगोदरपासून आखलेली होती, आणि ही हत्या प्रॉपर्टीच्या वादातून झाली आहे. फॉरेन्सिक पुरावे आणि ताब्यात घेण्यात आलेले मुद्दे खूप महत्त्वाचे आहेत.' स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव यांनी स्पष्ट केलं की, 'घटना झाल्यानंतरच आम्ही घटनास्थळी त्वरित पोहोचलो आणि दोघे सख्ख्या मुलांना अटक केली. ही घटना म्हसळा तालुक्यातील वृद्धांची सुरक्षा आणि मुलांच्या कुटुंबातील तणावाचे गंभीर उदाहरण आहे.'

## खडसेंच्या घरी चोरी; दोन आरोपी जाळ्यात, पोलीस तपासात काय समोर आलं?

**जळगाव :** एकनाथ खडसे यांच्या घरी झालेल्या चोरी प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. जळगाव येथे घरफोडी केल्यानंतर आरोपींनी उल्हासनगर येथे चिराग सय्यद या व्यक्तीकडे मुद्देमाल सोपवला होता. तसेच चिराग सय्यद याने हा मुद्देमाल कैलास खंडेलवाल नामक सराफ व्यावसायिकाकडे दिला होता. या दोघांनाही अटक करण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्ष घरफोडी करणारे तीन आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. एजाज अहमद, मोहम्मद बिलाल आणि बाबा अशी या मुख्य आरोपींची नावे आहेत. हे तिघेही सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पोलीस अधीक्षकांनी दिली.एकनाथ खडसे यांच्या घरी चोरी झाल्यानंतर त्यांनी आपल्या घरातून काही कागदपत्रं, सीडी व पेन ड्राईव्ह चोरी झालं असल्याचा दावा केला होता. अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मात्र, त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्रे, सीडी व पेन ड्राईव्ह आढळलेला नाही. तसेच एकनाथ



खडसे यांनी आपल्या एफआयआरमध्ये तसेच पुरवणी जबाबात कागदपत्रे, सीडी व पेन ड्राईव्ह चोरी झाल्याचं म्हटलं नसल्याचं पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी स्पष्ट केलं आहे.दिवाळीच्या सुट्ट्या असल्याने अनेकजण आपल्या कुटुंबासह बाहेर फिरायला जातात. ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे हे देखील दिवाळीनिमित्त बाहेरगावी असताना त्यांच्या जळगाव शहरातील शिवराम नगर भागातील घरी मध्यरात्री चोरट्यांनी चोरी करून ३५ हजार रुपये रोख आणि सात ते आठ तोळे सोने लंपास केल्याची काही दिवसांपूर्वी उघडकीस आली होती. खडसे यांच्या घरी झालेल्या चोरीच्या या घटनेमुळे जळगाव शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

## तरुणीला कारमध्ये नेउन शारीरिक अत्याचार

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमध्ये एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. 'तुझ्या वडिलांचा बळी घेईन' अशी भीती घालून महाविद्यालयात शिकणाऱ्या एका अल्पवयीन मुलीला सकाळी ८ वाजता बळजबरीने चारचाकी वाहनात बसवले. त्यानंतर फर्दापूर परिसरातील एका लॉजवर नेऊन तिच्यावर आरोपीने अत्याचार केला. ही घटना १ नोव्हेंबरला घडली असून, दुसऱ्या दिवशी रविवारी अजिंठा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला गेला. पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत. कृष्णा काळे (वय २५, राहणार शिवना) असं अत्याचार करणाऱ्या आरोपीचं नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कृष्णा याने अल्पवयीन मुलीला महाविद्यालयाच्या आवारातच गाठलं. बोलत असताना चारचाकी वाहनात बसण्यास सांगितलं. 'तुझ्या वडिलांचा बळी घेईन' अशी धमकी देऊन तिला वाहनात बसवून फर्दापूरला नेले. तिथं असलेल्या एका लॉजमध्ये घेऊन जात पुन्हा जीव घेण्याची धमकी देऊन तिच्यावर अत्याचार केला.

## १४ वर्षीय मुलीवर नराधमांचा सामूहिक अत्याचार, तिघांना ठोकल्या बेड्या..

**कोलकत्ता :** कोलकत्तामध्ये एका १४ वर्षीय मुलीवर सामूहिक अत्याचार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना पश्चिम बंगालच्या राजधानीतील डम डम परिसरात घडली आहे. मुलीच्या तक्रारीवरून पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून, घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

१ नोव्हेंबरला सायंकाळी ती ट्यूशनसाठी निघाली होती. त्यावेळी या तीन नराधमांनी मुलीला गाठलं आणि तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मुलगी त्या तिघांपैकी एका व्यक्तीला ओळखत होती. त्याच्यासोबत ती एका बागेत गेली. काही वेळानंतर दोन अज्ञात व्यक्तीसुद्धा तिथे आले. तिथून, त्या तिघांनी तिला बळजबरीने इ- रिक्षामध्ये बसवून म ोतिलाल कोलनीमध्ये एका घरात नेले. तिथे तिच्या छळ करून तिच्यावर तिघांनी लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप म ुलीने केला आहे.यानंतर मुलगी त्यांच्या तावडीतून वाचून रात्री त्या खोलीतून पळून गेली. तिथून ते थेट घरी गेली. तिथे पोहचल्यावर ही मुलीच्या मानसिक स्थिती अस्थिर होती. तीने हिंमतीने सर्व प्रकार आपल्या पालकांना सांगितला. तातडीने, तिच्या घरातल्यांनी डम डम पोलिस ठाणे गाठले आणि तिघांविरोधात तक्रार नोंदवली.गुन्हा दाखल करताच पोलिसांनी तपास सुरू केला. रविवारी (२ नोव्हेंबर) पर्यंत पोलिसांनी तिन्ही आरोपींचा छडा लावत त्यांना अटक केली.

आरोपींची नावे संजू साहू, राजेश पास्वान आणि विकी पास्वान अशी आहेत. तिघांविरूद्ध डम डम पोलिसांनी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. त्याचबरोबर, संजू साहूला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली असून, विकी आणि राजेशला एका दिवसीय न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. स्थानिक कार्यकर्त्यांनी या आरोपींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी रविवारी सकाळी डम डम पोलिस ठाण्याजवळ आंदोलन केले. त्याचबरोबर त्यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जींकडे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# गतिमंद चिमुकल्या विद्यार्थ्याला कुकरच्या झाकणाने मारहाण; केअर टेकर्स अनब शिपायाचं राक्षसी कृत्य..

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मांडकी गावाजवळील एका विशेष निवासी शाळेत गतिमंद लहान विद्यार्थ्यांवर केअरटेकर्सकडून निर्दयी मारहाण होत असल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर समाजात रोष निर्माण झाला आहे. या प्रकरणी मारहाण करणाऱ्यांवर चिकलठाणा पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, चैतन्य कानिफनाथ गतिमंद विद्यार्थ्यांसाठी असलेल्या या निवासी शाळेत शिपाई दीपक इंगळे याने एका लहान मुलाचे हात बांधून कुकरच्या झाकणासारख्या वस्तूने बेदम मारहाण केल्याचा व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे. यात मुलाचे असहाय्यपणा आणि वेदना स्पष्टपणे दिसत आहेत. हा प्रकार फक्त यापुरतेच मर्यादित नसून, शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही नियमित अत्याचार सहन करावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, केअरटेकर प्रदीप देहाडे हा विद्यार्थ्यांच्या छातीवर पाय ठेवून त्यांना मारहाण करत असल्याचं




सीसीटीव्हीमध्ये कैद झालं आहे. या अमानुष कृत्यांमुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शारीरिक सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे. संस्थेच्या व्यवस्थापनानेही या घटनांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे.,या प्रकरणाची तक्रार चिकलठाणा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून, पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला आहे. सीसीटीव्ही फुटेज जमा करण्यात आले असून, आरोपींवर अत्याचार आणि बालकांच्या अधिकारांचे उल्लंघनासंबंधी कायद्यांतर्गत कारवाई सुरू आहे. या घटनेमुळे विशेष गरजू मुलांच्या शाळांमधील सुरक्षेबाबत प्रश्न निर्माण झाला आहे.

दरम्यान, या अमानवी वागणुकीत दोन कर्मचाऱ्यांची नावे समोर आली आहेत दीपक इंगळे आणि प्रदीप देहाडे. दीपक इंगळे हा गेल्या १० वर्षांपासून या विद्यालयात शिपाई म्हणून कार्यरत आहे. त्याने एका विद्यार्थ्याला कुकरच्या झाकणाने मारहाण केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्याला निलंबित करण्यात आलं असून त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो संस्थाचालकाचा नातेवाईक असल्याची माहितीही समोर आली आहे. तर, प्रदीप देहाडे हा देखील दहा वर्षांपासून या संस्थेत काळजीवाहक म्हणून काम करत होता. विद्यार्थ्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करत असल्याचं सीसीटीव्ही फ ुटेज समोर आल्यानंतर त्याच्यावरही गुन्हा दाखल करून निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

# दीप्ती शर्माचा अनोखा विश्वविक्रम

## ही कामगिरी करणारी ती जगातील एकमेव खेळाडू

**मुंबई :** भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी हरवून महिला विश्वचषक २०२५ जिंकला. हा भारताचा पहिला मोठा स्पर्धेत विजय होता. हरम नप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने प्रथम फलंदाजी केली आणि २८९ धावा केल्या. त्यानंतर, दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना दीप्ती शर्माच्या गोलंदाजीचा सामना करता आला नाही आणि ते अत्यंत अपयशी ठरले. संपूर्ण आफ्रिकन संघ २४६ धावांवर गुंडाळला गेला, ज्यामुळे भारताला लक्ष्य सहज गाठता आले.

प्रथम फलंदाजी करताना, दीप्ती शर्माने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ५८ चेंडूत ५८ धावा केल्या, त्यात तीन चौकार आणि एक षटकार मारला. तिने रिचा घोषसह संघाला एकूण २९८ धावांपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तिच्या फलंदाजीनंतर, तिची गोलंदाजी कामगिरी देखील अतुलनीय होती, तिने ९.३ षटकांत ५ बळी घेतले. दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजी क्रमाला मोडून काढण्यात दीप्तीने महत्त्वाची भूमिका बजावली. आफ्रिकन संघाच्या फलंदाजांना धावा काढण्यासाठी




संघर्ष करावा लागला. तिला शफाली वर्माने चांगली साथ दिली, तिने दोन विकेट घेतल्या. दीप्ती शर्मा पुरुष असो वा महिला, कोणत्याही एकदिवसीय नॉकआउट सामन्यात अर्धशतक आणि पाच विकेट घेणारी पहिली खेळाडू ठरली. तिने तिच्या दमदार कामगिरीने हा विश्वविक्रम केला. तिच्या आधी कोणत्याही खेळाडूने एकदिवसीय नॉकआउट साम न्यात ही कामगिरी केली नव्हती. दीप्तीने २०२५ च्या महिला विश्वचषकात असाधारण कामगिरी केली आणि तिची प्रभावी कामगिरी अंतिम फेरीतही कायम राहिली.

दीप्ती शर्माने २०२५ च्या महिला विश्वचषकात एकूण नऊ सामने खेळले, २१५ धावा केल्या आणि तीन अर्धशतके केली. तिने तिच्या गोलंदाजीचे कौशल्य देखील दाखवले, २२ विकेट घेतल्या, जे २०२५ च्या महिला विश्वचषकात सर्वाधिक आहेत. तिच्या उत्कृष्ट फलंदाजी आणि शक्तिशाली गोलंदाजीसाठी तिला प्लेअर ऑफ द टूर्नामेंट पुरस्कार देखील मिळाला. स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात उत्कृष्ट खेळी केली. या खेळाडूंनी पहिल्या विकेटसाठी १०४ धावांची भागीदारी केली आणि मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. त्यांनी ७८ चेंडूत एकूण ८७ धावा केल्या, ज्यात सात चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. दीप्ती शर्माने ५८ धावा केल्या. या खेळाडूंमुळेच प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाने एकूण २९८ धावा केल्या. दरम्यान, आफ्रिकन संघासाठी कर्णधार लॉरा वोल्वार्डने १०१ धावा केल्या, परंतु तिला इतर खेळाडूंकडून साथ मिळाली नाही. यामुळे संघाचा पराभव झाला.

## पाकिस्तानी चाहत्यांनी 'जन गण मन' गायले ; भारताच्या विजेचा अनोखा उत्सव

**नवी दिल्ली :** भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये तणाव असला तरी, भावना आणि संगीत यांची ताकद नेहमीच सीमांपलीकडे जाते. याचा प्रत्यय सोशल मीडियावर एका व्हिडिओमुळे पुन्हा आला आहे. हा व्हिडिओ पाहून लाखो लोकांच्या डोळ्यांत अश्रू आणि चेहऱ्यावर स्मित उमटलं आहे.

हा भावनिक प्रसंग भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका महिला क्रिकेट विश्वचषक अंतिम सामन्यादरम्यानचा आहे. सामना सुरू होण्यापूर्वी गायक सुनिधी चौहान भारतीय राष्ट्रगीत 'जन गण मन' सादर करत होती. त्याच क्षणी पाकिस्तानातील तीन तरुण चाहते, दोन मुलगे आणि एक मुलगी आपल्या घरात मोठ्या टीव्हीवर सामना पाहत होते. राष्ट्रगीत वाजताच, या तिघांनी आपोआप उभे राहून हात छातीवर ठेवला आणि संपूर्ण आदराने भारतीय राष्ट्रगीत ऐकलं. त्यांच्या डोळ्यांत दिसणारा सन्मान आणि मनातील भावनिक अभिव्यक्तीने दोन्ही देशांतील लोकांना थक्क केलं. हा व्हिडिओ पाकिस्तानमधील अर्शद मुहम्मद यांनी रेकॉर्ड करून सोशल मीडियावर पोस्ट केला. काही तासांतच तो व्हायरल झाला आणि ट्विटर, इंस्टाग्राम, यूट्यूबवर लाखो



लोकांनी तो शेअर केला. अनेक भारतीय आणि पाकिस्तानी वापरकर्त्यांनी एकच भावना व्यक्त केली ङ्कसीमा वेगळी असली तरी, आदर आणि भावना या आपल्याला एकत्र आणतात.ङ्ग हा प्रसंग पुन्हा एकदा दाखवून देतो की, खेळ आणि संगीत यांच्या माध्यमातून मानवता नेहमी राजकारणापेक्षा मोठी ठरते.

## ट्रॅव्हिस हेड मालिकेतून बाहेर

**सिडनी :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरु असलेल्या पाच साम न्यांच्या टी-२० मालिकेत ऑस्ट्रेलियन संघाला मोठा धक्का बसला आहे. टीम चा स्फोटक सलामीवीर ट्रॅव्हिस हेड आगामी दोन टी-२० सामन्यांमध्ये खेळणार नाही. ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डाने त्याला मालिकेतून वगळत ॲशेस मालिकेच्या तयारीसाठी घरगुती रेड-बॉल क्रिकेट खेळण्यास परवानगी दिली आहे.



ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट बोर्डाने सोमवारी घोषणा करत सांगितले की, ट्रॅव्हिस हेड आता दक्षिण ऑस्ट्रेलियासाठी शेफील्ड शिल्ड स्पर्धेत तस्मानियाविरुद्धचा सामना खेळणार आहे. वेस्ट इंडिज दौऱ्यानंतर हा त्याचा पहिला प्रथम श्रेणी सामना असेल. हा निर्णय खेळाडूंच्या कामाचा ताण कमी करण्यासाठी आणि ॲशेसपूर्व तयारीसाठी घेतल्याचे बोर्डाने स्पष्ट केले. ट्रॅव्हिस हेडचा संघातून बाहेर पडणे हे भारतासाठी एक दिलासा देणारे पाऊल मानले जात आहे. हेडने मालिकेतील दुसऱ्या सामन्यात १५ चेंडूत २८ धावा केल्या होत्या, तर पावसामुळे खंडित झालेल्या तिसऱ्या सामन्यात तो केवळ ६ धावांवर बाद झाला. त्याच्या अनुपस्थितीत ऑस्ट्रेलियाची प्लेइंग इलेव्हन कशी असेल, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे. दरम्यान, इतर अनुभवी खेळाडू देखील घरगुती सामन्यांमध्ये सहभागी होणार आहेत. स्टीव्ह स्मिथ, मिशेल स्टार्क आणि जोश हेझलवूड न्यू साउथ वेल्सकडून शिल्ड सामन्यात खेळतील.

## BCCI चीमोहसिन नकवींना अंतिम चेतावणी, या तारखेला ट्रॉफी न दिल्यास कारवाई!



**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नकवीं आशिया कप ट्रॉफीबाबत अंतिम मुदत दिली आहे. २०२५ चा आशिया कप जिंकल्यानंतर भारताने मोहसिन नकवी यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला, ज्यामुळे नक्वी ट्रॉफी घेऊन मैदान सोडले. पाकिस्तानविरुद्ध अंतिम सामना जिंकूनही भारताला ट्रॉफी नाकारण्यात आली. बीसीसीआयने आता मोहसिन नकवी यांना ट्रॉफी सुपूर्द करण्यासाठी अंतिम मुदत दिली आहे. जर नकवींनी तोपर्यंत ट्रॉफी भारताला सुपूर्द केली नाही तर हा मुद्दा आयसीसीच्या बैठकीत उपस्थित केला जाईल.

बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी सांगितले की, 'दहा दिवसांपूर्वी आम्ही एसीसी अध्यक्षांना पत्र लिहून बीसीसीआयला लवकरात लवकर ट्रॉफी सोपवण्याची विनंती केली होती. तथापि, आम्हाला आजपर्यंत ट्रॉफी मि ळालेली नाही. आम्ही दुसऱ्या दिवसाची वाट पाहत आहोत. जर आम्हाला ३ नोव्हेंबरपर्यंत ट्रॉफी मिळाली नाही तर दुबईतील आयसीसी मुख्यालयात बैठक होईल. आम्ही आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्वोच्च संस्थेकडे आमची तक्रार मांडू. मला विश्वास आहे की आयसीसी न्याय करेल आणि भारताला लवकरात लवकर ट्रॉफी मिळवून देण्यास मदत करेल.'

एप्रिलमध्ये पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला आहे. भारताने ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानला प्रत्युत्तर दिले. त्यानंतरही भारताने प्रत्येक व्यासपीठावर पाकिस्तानवर बहिष्कार टाकला. या संदर्भात, टीम इंडियाने आशिया कपमध्ये पाकिस्तानवर बहिष्कार टाकला आणि पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन



करण्यासही नकार दिला. आशिया कप ट्रॉफी न मिळाल्यानंतरही, भारतीय संघाने विजय साजरा करण्याची संधी सोडली नाही. कर्णधार सूर्यकुमार यादवने २०२४ च्या टी-२० विश्वचषकात काल्पनिक ट्रॉफी उचलून संघासोबत आनंद साजरा केला.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सर्वात महागडी आणि यशस्वी फिल्म ठरली



**मुंबई :** भोजपुरी सिनेसृष्टीचा सुपरस्टार खेसारी लाल यादव नेहमीच आपल्या अभिनयाने आणि सिनेमॅटिक प्रयोगांनी चाहत्यांना प्रभावित करत आले आहेत. रोमँस असो, एक्शन असो किंवा देशभक्तिपूर्ण भूमिका, खेसारीचा अंदाज नेहमीच हटके असतो. मात्र यावेळी त्यांनी असा पाऊल उचलले आहे की संपूर्ण भोजपुरी फिल्म इंडस्ट्रीला अभिमान वाटतोय. त्यांच्या नव्या चित्रपट 'रंग दे बसंती' ने केवळ रेकॉर्ड मोडले नाही, तर हा चित्रपट भोजपुरी सिनेसृष्टीतील आतापर्यंतचा सर्वात महागडी चित्रपट ठरला.

साल २०२४ मध्ये रिलीज झालेल्या 'रंग दे बसंती'चा बजेट भोजपुरी सिनेसृष्टीच्या दृष्टीकोनातून अतिशय मोठा आहे. रिपोर्ट्सनुसार या चित्रपटावर सुमारे ७ ते १० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. ही पहिली वेळ आहे जेव्हा एखाद्या भोजपुरी सिनेमावर इतक्या मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला. चित्रपटात भव्य सेट्स, दमदार एक्शन आणि उत्कृष्ट लोकेशन्सचा वापर करण्यात आला आहे. मेकर्सनी या सिनेमाची शूटिंग पूर्णपणे बॉलीवुड स्तरावर केली आहे, ज्यामुळे प्रेक्षकांना एक वेगळा सिनेमाई अनुभव मिळेल.फक्त खेसारींचा मुख्य भूमिका निभावणे नव्हते, तर त्यांनी या चित्रपटाच्या प्रोडक्शनमध्ये देखील महत्त्वाची भूमिका बजावली आहे. 'रंग दे बसंती'मध्ये खेसारी यांच्यासोबत त्यांचा मुलगा ऋषभ यादव ही पाहुणा म्हणून पदार्पण करताना दिसतोय. पिता-पुत्र यांची ही जोडी मोठ्या पडद्यावर पहिल्यांदाच दिसत आहे. ऋषभ याने चित्रपटात एका लहान पण महत्त्वाच्या भूमिकेत काम केले असून, हा चित्रपट त्याच्या इंडस्ट्रीतील डेब्यूचा साक्षीदार आहे.

चित्रपटाची कथा एका सैनिकाभोवती फिरते. खेसारी लाल यादव या चित्रपटात फौजीच्या भूमिकेत दिसतात, ज्यात देशभक्ती, भावनिक क्षण आणि थरारक एक्शन यांचा उत्तम संगम आहे. 'रंग दे बसंती' भारतभर २५० हून अधिक सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित करण्यात आला आणि पहिल्यांदाच भोजपुरी चित्रपटाला मल्टीप्लेक्समध्ये देखील स्थान मिळाले. चित्रपटाने रिलीजच्या पहिल्या दिवशीच जोरदार कमाई सुरू केली. फक्त सुरुवातीच्या तीन दिवसांत चित्रपटाने सुमारे ४५ लाख रुपये कमावले. अखेर 'रंग दे बसंती'ने एकूण १५ ते २० कोटी रुपयांची कमाई करून भोजपुरी सिनेसृष्टीसाठी नवे रेकॉर्ड स्थापन केले. या यशाने खेसारी लाल यादवला आणि त्यांच्या टीमला देशभरातून प्रशंसा मिळाली असून, या चित्रपटाने भविष्यातील भोजपुरी चित्रपटसृष्टीला एक नवीन उंची गाठण्याची शक्यता निर्माण केली आहे.

## रवि किशणला दादासाहेब फाळके फिल्म फेस्टिव्हल पुरस्कार

**मुंबई :** अभिनेता रवि किशण शुक्लाला त्यांच्या अभिनयासाठी आणखी एक मोठा सन्मान मिळाला आहे. नुकत्याच झालेल्या दादा साहेब फाळके इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल २०२५ मध्ये रवि किशण यांचा नामांकन स्वीकारून त्यांना सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराने त्यांच्या ३३ वर्षांच्या अभिनय प्रवासाला मान्यता मिळाली आहे, विशेषतः त्यांच्या अलीकडील चित्रपट 'लापता लेडीज' मधील अभिनयासाठी.



पूर्वीच या चित्रपटासाठी त्यांना सर्वश्रेष्ठ सहायक अभिनेता म्हणून फिल्मफेअर पुरस्कार मिळालेला आहे. या बातमीची माहिती समजताच त्यांच्या चाहत्यांमध्ये आनंदाची लाट पसरली. अनेक चाहत्यांनी त्यांना भेटण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी धाव घेतली, परंतु रवि किशण सध्या बिहार निवडणुकीतील कामामुळे व्यस्त असल्याने त्यांना भेटता आले नाही. रवि किशण शुक्ला हे गोरखपूर संसदीय क्षेत्रातून दुसऱ्यांदा भाजपच्या तिकिटावर सांसद आहेत. अभिनेता म्हणून त्यांनी भोजपुरी आणि हिंदी चित्रपटांसोबतच दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतही आपला अभिनय सिद्ध केला आहे. रवि किशण सध्या राजकारणात सक्रिय असून, नुकतीच बिहारमध्ये त्यांच्यावर जीवघेणी धमकी देण्यात आली होती. अशा चर्चेच्या पार्श्वभूमीवर ही आणखी एक उपलब्धी त्यांच्या नावावर नोंद झाली आहे.



## अल्फाची रिलीज पुढे ढकलली..

**मुंबई :** लिया भट्टच्या आगामी चित्रपट 'अल्फा'च्या चाहत्यांसाठी काहीतरी धक्कादायक बातमी आहे. या चित्रपटात आलिया एका स्पाय एजंटच्या भूमिकेत दिसणार आहे. त्यांच्या सोबत शरवरी वाघही या फिल्ममध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारत आहे. यशराज फिल्म्सच्या बॅनरखाली तयार होणारी ही फिल्म पूर्वी या वर्षीच प्रेक्षकांच्या भेटीस येणार होती, मात्र आता मेकर्सने तिची रिलीज तारीख बदलली आहे.

'अल्फा'ची घोषणा ऑक्टोबर २०२४ मध्ये करण्यात आली होती आणि २५ डिसेंबर २०२५ रोजी चित्रपट थिएटर्समध्ये प्रदर्शित होणार असल्याचे जाहीर केले गेले होते. मात्र, आता मेकर्सने ती पोस्टपोन करत १७ एप्रिल २०२६ रोजी चित्रपट रिलीज करण्याचा निर्णय घेतला आहे.धठत्रऱ्या प्रवक्तृयाच्या मते, आल्फा आमच्यासाठी खूप खास फिल्म आहे. आम्हाला ही फिल्म शक्य तितक्या सिनेमॅटिक अंदाजात प्रेक्षकांसमोर सादर करायची आहे. तत्रद्ध कामात अपेक्षित वेळेपेक्षा अधिक वेळ लागत असल्यामुळे आम्ही कोणतीही कमी राहू नये म्हणून फिल्म पुढे ढकलली आहे. 'अल्फा'द्वारे प्रेक्षकांना एक विस्मरणीय सिनेमॅटिक अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न आहे. 'अल्फा' हे YRF SPY यूनिव्हर्सचा भाग असून या यूनिव्हर्समध्ये सलमान खानची 'टायगर' फ्रेंचायझी, ऋतिक रोशनची 'वॉर' फ्रेंचायझी आणि शाहरुख खानची 'पठान' देखील समाविष्ट आहे. आलिया आणि शरवरी या यूनिव्हर्समध्ये महिला-नेतृत्वातली पहिली एक्शन फिल्म साकारत आहेत, ज्यामुळे चित्रपट अधिक आकर्षक ठरणार आहे. चित्रपटात बॉबी देओल आणि अनिल कपूर देखील महत्त्वपूर्ण भूमिकेत आहेत. विशेष म्हणजे अनिल कपूर यांना यावर्षी ऑगस्टमध्ये प्रदर्शित झालेल्या ऋतिक रोशनच्या वॉर २' मध्ये देखील पाहायला मिळाले होते. आता पाहावे लागेल की आलिया आणि शरवरी या एजंटच्या भूमिकेत कसा धमाका करतात आणि प्रेक्षकांना कितपत प्रभावित करतात.



## रा.वन २ लवकरच...

**मुंबई :** बॉलीवुडचे 'किंग खान' शाहरुख खान नुकतेच ६० वर्षांचे झाले आणि त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी चाहतेसाठी खास फॅन मीटचे आयोजन केले. या कार्यक्रमात शाहरुखने हजारो चाहत्यांशी संवाद साधला, त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली आणि २०११ मध्ये आलेल्या त्यांच्या हिट चित्रपट 'रा.वन' च्या सीक्वलवरही चर्चा केली.

'रा.वन'चे दिग्दर्शन अनुभव सिन्हा यांनी केले होते आणि ती फिल्म त्या काळात तितकीच लोकप्रिय ठरली होती. शाहरुख खान म्हणाले, ङ्गही एक वेगळी आणि माझ्या हृदयाजवळची फिल्म होती. अनुभवने यावर खूप मेहनत घेतली. मला वाटत होते की ही फिल्म नवीन ट्रेंड निर्माण करेल. जर मी एखादी फिल्म बनवत असेल, कारण माझी स्थिती इथे चांगली आहे आणि वरच्या पक्षाची कृपा आहे, तर मला अशी काहीतरी बनवायची हवी ज्यामुळे इतर लोकही अशा चित्रपटांची निर्मिती करण्यासाठी प्रेरित होतील. हे आमच्या देशासाठी फार महत्वाचे आहे.

शाहरुखने पुढे सांगितले की, 'रा.वन' ही फक्त सुपरहीरो फिल्म नव्हती, तर यात व्हिज्युअल इफेक्ट्स आणि तंत्रज्ञानात नवसृजन करण्याचा प्रयत्नही केला गेला होता. जरी ही फिल्म अपेक्षांप्रमाणे यशस्वी ठरली नसली, तरी त्यावेळी प्रेक्षकांनी तिचे कौतुक केले होते. शाहरुखने नमूद केले की, आजच्या काळात जर ही फिल्म येत असेल, तर लोक तिला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेतील. त्यावेळी प्लेस्टेशन, व्हिडिओ गेम्स आणि आयपॅडसारख्या तंत्रज्ञानाबाबत लोक फारशी माहिती नव्हती, तर आज प्रत्येकजण स्मार्टफोनसह या गोष्टींशी परिचित आहे. शाहरुखने सीक्वलवर बोलताना सांगितले, ङ्गहो, जर अनुभव यांनी ठरवले, तर 'रा.वन २' बनवता येऊ शकते. त्यांच्याच हातात मूळ चित्रपट तयार करण्याचा अनुभव आहे. आम्ही या चित्रपटावर खूप मेहनत केली होती. जर वरच्या पक्षाची इच्छा असेल आणि वेळ योग्य असेल, तर आम्ही पुन्हा एकदा हा चित्रपट घेऊ शकतो. आता संसाधने आणि तंत्रज्ञान अधिक सुलभ आहेत, त्यामुळे हे शक्य आहे. 'रा.वन' चित्रपटाचा त्या काळचा बजेट १३० कोटी रुपये होता आणि तो त्या वेळेतील सर्वात महागडा बॉलीवुड चित्रपट मानला जात होता. यात शाहरुख खानसोबत करीना कपूर खान आणि अर्जुन रामपाल यांचाही महत्त्वाचा सहभाग होता. या चित्रपटाने वर्ल्डवाइड २०६ कोटींचा व्यवसाय केला होता.शाहरुखच्या चाहत्यांमध्ये 'रा.वन २' ची अपेक्षा आता तितकीच वाढली आहे आणि अनेक चाहते या आगामी सीक्वलसाठी उत्सुकतेने वाट पाहत आहेत.

# सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी सुवर्णसंधी



जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजागार युवक व युवतींसाठी बुलडाणा येथे शेळीपालन, कुक्कुटपालन, गाय, म्हैसपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दि. १० ते १४ नोव्हेंबर २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत होणार आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश हा सुशिक्षित बेरोजगार यांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. या प्रशिक्षणात शेळीपालन, कुक्कुट आणि गाय म्हैस पालनाचे तंत्र व प्रकार, त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन, रोग व लक्षणे, खाद्य निर्मिती व चाऱ्याचे प्रकार व उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाणार आहे. त्यासोबत उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, शासकीय योजनाची माहितीचे मार्गदर्शन या प्रशिक्षणात तज्ञ व्यक्ती करणार आहे.

प्रशिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार हा किमान ५ वी पास, वय १८ ते ६० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिल्या जाईल. प्रशिक्षणासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली असून त्यासाठी दि. १४ नोव्हेंबरपर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालय जवळ, चिखली रोड, बुलडाणा यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय त्यांना ८२७५०९३२०१/९०११५७८८५४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी किशोर अंभोरे यांनी केले आहे.

# अँड शर्वरीताई रविकांत तुपकर शेतकऱ्यांच्या बांधावर शेतकऱ्यांना दिला धीर....

## सरकारने नुकसानीचे पंचनामे करून त्वरित मदत द्यावी - शर्वरीताई रविकांत तुपकर

जनसंचलन/बुलडाणा

मोताळा तालुक्यातील पिंपळगाव देवी, सिंदखेड लपाली आणि लिहा या परिसरात झालेल्या अतिवृष्टीसदृश्य पावसामुळे शेतकऱ्यांवर मोठं संकट ओढावलं आहे. काही तासांतच झालेल्या मुसळधार पावसाने शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. पिके वाहून गेली, माती खरडून गेली आणि शेतकऱ्यांचे संपूर्ण परिश्रम पाण्यात गेले. या गंभीर परिस्थितीची दखल घेत अ‍ॅड. शर्वरीताई रविकांत तुपकर यांनी स्वतः या अतिवृष्टीग्रस्त भागांची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला आणि शासनाकडे त्वरित मदतीची मागणी केली. या भागात काही तासांत पडलेल्या मुसळधार पावसामुळे शेतातील मक्याच्या पिकाला कोंब फुटले, उभी पिके पाण्यात वाहून गेली, तर अनेक ठिकाणी ठिबक, स्प्रिंकलर संच आणि मोटारी पाण्याबरोबर वाहून गेल्या. काही शेतांमधील सुपीक माती पूर्णपणे नाल्यांत गेली, त्यामुळे पुढील हंगामासाठी जमीन पुन्हा तयार करावी लागणार आहे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर निराशा आणि चिंता स्पष्ट दिसत असताना, शर्वरीताई तुपकर यांनी प्रत्यक्ष गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी नुकसानग्रस्त शेतांची पाहणी केली, शेतकऱ्यांच्या व्यथा मनापासून ऐकल्या आणि त्यांना धीर दिला. या भेटीदरम्यान बोलताना शर्वरीताई म्हणाल्या या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान झाले आहे. अनेकांची पिके, शेतीमाल आणि साधनसामग्री पूर्णपणे वाहून गेली आहेत. शासनाने तातडीने पंचनामे करून प्रत्येक शेतकऱ्याला योग्य आर्थिक मदत द्यावी. ही फक्त भरपाई नसून, शेतकऱ्यांच्या आयुष्याला पुन्हा उभारी देणारा हातभार असावा.फ्फ त्यांनी प्रशासनाला आवाहन केले की, पंचनामे त्वरित पूर्ण करून प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या हातात पोहोचली पाहिजे, केवळ आश्वासने नव्हे तर ठोस कृती झाली पाहिजे. या भेटीदरम्यान शर्वरीताईंसोबत स्थानिक कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा सांगितल्या. काहींनी सांगितले की वर्षभराच्या मेहनतीनंतर पिके तयार होती, पण काही तासांच्या पावसाने सर्व काही उद्ध्वस्त केले. शर्वरीताईंनी शेतकऱ्यांना धीर देत सांगितले की, शेतकऱ्यांच्या लढाईत मी नेहमी सोबत आहे. ही संकटाची वेळ तात्पुरती आहे, पण शासनाने योग्य वेळी योग्य निर्णय घेतला नाही, तर ही स्थिती आणखी बिकट होईल.फ्फ या भेटीदरम्यान पिंपळगाव देवी, सिंदखेड लपाली आणि लिहा गावांतील शेतकऱ्यांनी अ‍ॅड. शर्वरीताई तुपकर यांच्या संवेदनशीलतेचे आणि तत्परतेचे कौतुक केले. त्यांच्या उपस्थितीने शेतकऱ्यांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला. शेती वाचवण्यासाठी, शेतकरी उभा राहण्यासाठी शासनाने आजच ठोस निर्णय घ्यावा,फ्फ अशी ठाम मागणी शर्वरीताई तुपकर यांनी केली.

# आता ९ दुर्धर आजारांचा समावेश राखीव निधीत प्रत्यारोपण आणि रिप्लेसमेंटची मिळणार रुग्णांना सुविधा ....!!

## गरजुंनी योजनेचा लाभ घेण्याचे केंद्रीय आयुष ,आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातर्फे करण्यात आले आवाहन ...!



जनसंचलन/बुलडाणा

प्रत्येकाला सहज ,सुलभ ,आणि माफक अशी आरोग्य सेवा मिळावी या दृष्टिकोनातून केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत विविध आजारांवर मोफत उपचार केल्या जातात . आता नव्याने ९ दुर्धर आजारांचा समावेश राखीव निधीत समाविष्ट केल्यामुळे प्रत्यारोपण आणि रिप्लेसमेंट सारखी सुविधाही सर्वसामान्य जनतेला मिळणार आहे .तेव्हा शासनाच्या या योजनेचा गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालतून करण्यात आले आहे . सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू समजून जनतेला सहज सुलभ आणि माफक दरात आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने विविध योजना राबविण्यात येत आहे यामध्ये एकत्रित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना - महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत विविध आजारांवर मोफत उपचार करण्यात येतात . या योजनेत अंतर्गत प्रति वर्ष ,प्रती कुटुंब पाच लाखांपर्यंत आरोग्य विषयक खर्च सरकारतर्फे मोफत करण्यात येतो . आता राखीव निधीत समाविष्ट असणारे ९ दुर्धर आजार आणि उच्चतम मर्यादा यामध्ये सरकारने वाढ केली आहे त्यानुसार यकृत प्रत्यारोपण साठी २२ लाख रुपये, फुफ्फुस प्रत्यारोपण साठी २० लाख रुपये , हृदय व फुफ्फुस प्रत्यारोपणसाठी २० लाख रुपये , अस्थिमज्जा प्रत्यारोपण (अनरिलेटेड) साठी १७ लाख रुपये , अस्थिमज्जा प्रत्यारोपण ( हॅप्लो) साठी १७ लाख रुपये , हृदय प्रत्यारोपण साठी १५ लाख रुपये , ट्रान्स कॅथेटर एऑटिक व्हॉल्च इम्प्लांटेशन साठी १० लाख रुपये , ट्रान्स कॅथेटर एऑटिक व्हॉल्च रिप्लेसंमेन्ट साठी १० लाख रुपये आणि अस्थिमज्जा प्रत्यारोपण (अलोजे निक) साठी ९ लाख ५० हजार रुपये खर्च आता शासकीय रुग्णालयांना मिळणाऱ्या निधी पैकी २०% निधीतून या नऊ दुर्धर आजारांसाठी राखीव ठेवण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाच्यावतीने घेण्यात आला आहे .त्यामुळे अंगीकृत सगळ्या शासकीय रुग्णालये , आरोग्य संस्था तसेच अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करिता मान्यता प्राप्त असलेल्या सर्व रुग्णालये , आरोग्य संस्था आणि खाजगी रुग्णालयाहीतही उपचार करण्यात येणार आहे . या योजनेचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा असे आवाहन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालय आणि भूमिपुत्र वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील खरीप हंगामाची सुधारीत पैसेवारी जाहीर...

जनसंचलन/बुलढाणा

सन २०२५-२६ च्या खरीप हंगामातील बुलढाणा जिल्ह्यातील १ हजार ४२० गावाची सुधारीत पैसेवारी सरासरी ४९ पैसे इतकी जाहीर करण्यात आली आहे. यातील १ हजार १२२ गावांची खरीप हंगामाची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आहे. तर २९८ गावांची पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा जास्त आहे.

५० पैसेपेक्षा कमी अंतिम पैसेवारी असलेले गावे : बुलढाणा तालुक्यात ९८, चिखली येथे १४४, देऊळगाव राजा येथे ६४, मेहकर येथे १६१, लोणार येथे ९१, सिंदखेड राजा येथे ११४, मलकापूर येथे ७३, नांदुरा येथे ११२, खामगाव येथे १४६, जळगांव जामोद येथे ११९ असे एकूण १ हजार १२२ गावांची पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा कमी आहे. ५० पैसेपेक्षा जास्त अंतिम पैसेवारी असलेले गावे: मोताळा येथे १२०, शेगांव येथे ७३ व संग्रामपूर येथे १०५ असे एकूण २९८ गावे गावांची पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा जास्त आहे.



# दुसरबीडचा रिंग रोड बनला धोकादायक अपघात वाढले!

## निकृष्ट काम झाल्याचा आरोप: खड्ड्यांचे साम्राज्य !

जनसंचलन/दुसरबीड

येथील ७५३ सी महामार्ग व समृद्धी महामार्गाला जोडणारा रिंग रोडवर सध्या मोठमोठे खड्डे पडले आहेत. केवळ काही महिन्यांतच हा रस्ता उखडला असून, अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. दोन दिवसांपूर्वीच साखरखेर्डा येथील दोन निरपराध नागरिकांचा या रस्त्यावर झालेल्या अपघातात मृत्यू झाला होता. त्यामुळे या रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवावे, अशी मागणी होत आहे. रिंग रोडचे काम हे दर्जाहीन झाल्याची आरोप स्थानिकांकडून होत आहे. दर्गा परिसरात व मुख्य चौकात मोठे खड्डे पडल्याने वाहनधारकांना संतुलन राखणे कठीण झाले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी प्रकाशाचा अभाव, शोल्डर व दिशादर्शक फलकांचा अभाव, तसेच भराव व खड्यांच्या जाळ्यामुळे अपघातांची मालिका सुरूच रिंगरोडवर असे मोठे खड्डे पडले आहेत. आहे. ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, एमएसआरडीसीचे अधिकारी सर्व काही पाहत असूनही दर्जाही कामाबद्दल का मौन बाळगून आहेत. अर्धवट काम, निकृष्ट दर्जा आणि प्रशासनाचे दुर्लक्ष, या तिन्हींच्या संगनमताचा बळी सामान्य नागरिक ठरत असल्याची तीव्र भावना नागरिकांत व्यक्त होत आहे. या गंभीर प्रकाराचा तातडीने तपास करून जबाबदार कंत्राटदार कंपनीवर कारवाई करण्यात यावी आणि रिंग रोडची पुनर्बांधणी करून नागरिकांचे जीव वाचवावेत, अशी स्थानिकांची मागणी आहे.



# ट्रकची धडक सोलार स्ट्रीट लाईट कोसळला!

जनसंचलन/ देऊळगाव राजा

चिखली मार्गावर १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास अज्ञात ट्रकने सोलार स्ट्रीट लाईट खांबाला जोरदार धडक दिली. या अपघातात खांब कोसळल्याने २.५२ लाखांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने या अपघातात जीवितहानी झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, (एमएच २१ एक्स ५४००) क्रमांकाचा ट्रक चालकाने निष्काळजीपणे भरधाव वेगात वाहन चालवित असताना लाईनवरील पोल क्रमांक १४ला धडक दिली. या धडकेत सुमारे नऊ मीटर लांबीचा पोल जमिनीवर कोसळला. त्यावर बसवलेले दोन सोलार लाईट, दोन बॅटऱ्या, सोलार पॅनल, दोन ब्रेकेट, आयर्न प्लेट, पॅनल बोर्ड आणि इतर उपकरणे नष्ट झाली. नगरपरिषद, देऊळगाव राजा यांच्या ताब्यातील या मालमत्तेचे २.५२ लाखांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी पालिकेचे विद्युत अभियंता विशाल सैवर यांनी ३ नोव्हेंबर रोजी पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून अज्ञात ट्रकचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कवयित्री रेशमाई खरात यांच्या १२व्या पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन

जनसंचलन/मेहकर



विदर्भाच्या बहिणाबाई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि तिफन पुरस्कार प्राप्त सुप्रसिद्ध कवयित्री तथा शिवसेना आमदार सिद्धार्थ खरात यांच्या मातोश्री स्व.रेश्माई रामभाऊ खरात यांच्या १२व्या पुण्यस्मरणानिमित्त मेहकर-लोणार मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांच्या जनसंवाद कार्यालयात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी न.प.सभापती भास्करराव गारोळे पाटील यांनी भूषविले.

या प्रसंगी काँग्रेस नेते ॲड. अनंत वानखेडे,( मेहकर विधानसभा समन्वयक) श्याम पाटील, युवा सेनेचे संदीप गारोळे, उपतालुकाप्रमुख रमेश बापू देशमुख, उटीचे सरपंच संजय सुळकर, विठ्ठलवाडीचे सरपंच धनराज राठोड, काँग्रेस सेवादलाचे उपाध्यक्ष शैलेश बावस्कर, अशोकमामा तुपकर, ॲड. संदीप गवई, तालुका अध्यक्ष अमोल बोरे, लोणार तालुका महिला आघाडी प्रमुख तारामती जायभाये, मेहकर शहर अध्यक्ष पौर्णिमा गवई, संघटक नगमा गवळी, सुशीला मोरे, कवी तानाजी जाधव, सतीश देशमुख, नामदेव काटेकर, गणेश बोर्डे, रमेश अवसरमोल, राहुल चव्हाण, ज्ञानेश्वर राठोड, पिंटू जाधव, सुनील आडे, देवानंद जाधव, जगन्नाथ त्रिपाठ, सिद्धार्थ गवांदे, संजय नवले, विजय खरात, प्रविण सरदार, गणेश माळेकर, भागवत बोरकर, गणेश धोंडगे, वसंता घायवट, आकाश अवसरमोल, रफिक गवळी, किशोर आराख, पत्रकार रविंद्र वाघ, शाहिर देवानंद वानखेडे, पत्रकार पुरुषोत्तम बोर्डे, राजू गवई, वैभव देशमुख, शिवम लोणकर आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी कवयित्री स्व.रेश्माई खरात यांच्या कवितांमधून समाजातील वास्तव मांडण्याच्या त्यांच्या अद्वितीय शैलीचा उल्लेख करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमात उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा व विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. कवितेच्या माध्यमातून समाजमनाला जागवणाऱ्या रेश्माई ताईंचे कार्य प्रेरणादायी आहे, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# दिवाळीत मेहकर सरास सेतू केंद्रावर उत्पन्न दाखल्यासाठी दीडशे रुपये आकारणी: नागरिकांची लूट थांबणार का?

जनसंचलन/मेहकर



मेहकर येथील सरास सेतू केंद्रावर उत्पन्नाचा दाखला काढण्यासाठी नागरिकांकडून महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा जास्त, म्हणजेच तब्बल दीडशे रुपये (रु १५०) आकारले जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. शासनाच्या अधिकृत दरपत्रकानुसार, उत्पन्नाच्या दाखल्यासाठीचे शुल्क खूप कमी असताना, सेतू केंद्र चालकांकडून सर्रासपणे अतिरिक्त रक्कम घेऊन नागरिकांची आर्थिक लूट केली जात असल्याचा आरोप होत आहे.

काय आहे अधिकृत दर? महाराष्ट्र शासनाच्या आपले सरकार सेवा केंद्रासाठी निश्चित केलेल्या दरपत्रकानुसार, उत्पन्नाच्या दाखल्यासाठीचे अधिकृत शासकीय शुल्क साधारणपणे ६९ रुपयांच्या दरम्यान (सेवा शुल्क आणि इतर कर मिळून) आहे. काही माहितीनुसार, हे अर्ज शुल्क केवळ २० रुपये आणि इतर खर्च मिळून सुमारे ३४ ते ५८ रुपये इतके असू शकते. मात्र, मेहकर येथील सरास केंद्रावर विहित दरापेक्षा दुप्पटहून अधिक रक्कम म्हणजेच १५० रुपये घेतले जात आहेत.

नागरिकांची ओरड, प्रशासनाचे दुर्लक्ष दररोज अनेक नागरिक, विशेषतः विद्यार्थी आणि शेतकरी, शिष्यवृत्ती, सरकारी योजना किंवा इतर कामांसाठी उत्पन्नाचा दाखला काढण्याकरिता सेतू केंद्रावर येतात. त्यांना नाइलाजास्तव ही अतिरिक्त रक्कम मोजावी लागते. अनेकदा सेतू केंद्र चालक सेवा लवकर मिळवून देण्याचे किंवा इतर कारणे सांगून जास्त पैसे उकळतात. या प्रकारामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. शासनाने सर्व सेतू केंद्रांवर दरपत्रक दर्शनी भागात लावण्याचे निर्देश दिलेले आहेत. तसेच, ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा जास्त रक्कम आकारल्यास संबंधित केंद्र चालकांवर दंडात्मक कारवाई किंवा प्रसंगी फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी यापूर्वीच दिला आहे. असे असतानाही, मेहकरमध्ये हा प्रकार सुरूच आहे. जबाबदार प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन, तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि नागरिकांची होणारी लूट थांबवावी, अशी मागणी जोर धरत आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८